**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २७ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यभरात उद्या होणारी शिक्षक पात्रतेसाठीची टीईटी परीक्षा पेपरफुटीमुळे पुढे ढकलली, भिवंडी पोलिसांची तिघांना अटक विरोधकांची चौकशीची मागणी.**
2. **पक्षांतर करणाऱ्या खासदारांवर उद्धव ठाकरे यांची यवतमाळच्या सभेत जोरदार टीका.**
3. **शहीद जवानांच्या कुटुंबियांना मुद्रांक शुल्कातून पूर्ण दिलासा- महसूल मंत्री बावनकुळे यांची माहिती.**
4. **नागपूर महानगरपालिकेचा सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा करवाढ नसलेला 6,202.99 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

शिक्षक पात्रता परीक्षा

राज्यभरात उद्या होणारी शिक्षक पात्रतेसाठीची टीईटी परीक्षा पेपरफुटीमुळे पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं आज ही माहिती दिली. भिवंडी इथल्या काही जणांकडे या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबद्दल माहिती असल्याची माहिती मिळाल्याने भिवंडी पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकत पोलिसांनी मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली आहे. प्राथमिक तपासात आरोपी दिल्लीहून TET परीक्षेचे प्रश्नपत्र घेऊन भिवंडीत आले होते आणि ते सुमारे दीड कोटी रुपयांत विकण्याच्या तयारीत असल्याचे समोर आले आहे. राज्यभरातील १,०२८ केंद्रांवर उद्याआयोजित करण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पुढे ढकलण्यात आली असून ही परीक्षा प्रक्रीया पारदर्शकतेत होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याच. परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणावरून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. भाजप सरकारला कोणतीही परीक्षा पेपरफुटीशिवाय घेता येत नसल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची

मागणी त्यांनी केली. अन्यथा तरुणांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरेल, असा इशाराही त्यांनी दिला. पेपरफुटीमागील रॅकेट आणि त्याला मिळणारे कथित राजकीय संरक्षण उघड करण्याची गरज असल्याचेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे सभा

यवतमाळ इथं आयोजित जाहीर सभेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेना शिंदे गट, भाजप आणि पक्षांतर केलेले खासदार संजय देशमुख यांच्यावर जोरदार टीका केली. पक्षांतरापूर्वी केलेल्या वक्तव्याचा व्हिडिओ सभेत दाखवत त्यांनी संजय देशमुख यांनी जनादेशाशी गद्दारी केल्याचा आरोप केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही निशाणा साधत, पक्ष आणि चिन्ह हिरावून घेतले तरी शिवसेना खंबीरपणे उभी असल्याचा दावा त्यांनी केला. जोपर्यंत शिवसैनिक माझ्यासोबत आहे, तोपर्यंत कुणीही कितीही प्रयत्न केले तरी शिवसेना संपवू शकत नाही असेही ठाकरे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी स्पष्ट केले.

विकासनिधी वाटपात भेदभाव होत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारवर प्रश्न उपस्थित केले. राम मंदिर, शेतकरी, पीक विमा आणि संविधानाच्या मुद्द्यांवरूनही त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली. राम मंदिरातील देणग्यांचा हिशेब जाहीर करण्याची मागणी करत या विषयावर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांना पीक विम्यापासून वंचित ठेवल्याचा आरोप करत सरकारला जाब विचारण्याचे आवाहन त्यांनी केले. सभेच्या शेवटी गद्दारी करणाऱ्यांना आगामी काळात जनतेने जाब विचारावा, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.

विद्यार्थ्यांशी संवाद

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल दिल्लीतील राष्ट्रपती भवनात गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधल्या ९६ आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. “मोठी स्वप्नं पाहून शिक्षणाच्या बळावर ती पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करा,” असा प्रेरक संदेश मुर्मू यांनी या विद्यार्थ्यांना दिला. जिल्हा वार्षिक

आदिवासी योजनेंतर्गत गडचिरोली, अहेरी आणि भामरागडच्या शासकीय आश्रमशाळांमधले हे विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी त्या ठिकाणी दाखल झाले.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरुन मन की बातच्या १३५व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन एआरआर ॲपवरून मन की बात ऐकता येणार आहे.

'हायड्रोजन रेल्वे'

हरियाणातील रेल्वे रुळांवरून आज देशातील पहिली 'हायड्रोजन रेल्वे' यशस्वीरित्या धावली आहे. भारतीय रेल्वेने आज देशातील पहिल्या हायड्रोजन रेल्वेची यशस्वी चाचणी घेतली. या चाचणीदरम्यान प्रामुख्याने रेल्वेच्या आपत्कालीन ब्रेक यंत्रणेचे अंतर आणि वेगातील संतुलन या तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

एमएसएमई दिन

संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचं सामर्थ्य एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या योगदानावर अवलंबून आहे, असं मत उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. एमएसएमई दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. एमएसएमई क्षेत्र देशातल्या नवउद्योजकांच्या पहिल्या पिढीच्या धाडसाचं प्रतिनिधित्व करत असल्याचं त्यांनी सांगितलं. हे क्षेत्राची उत्पादनं उच्च गुणवत्ता बाळगत देशाच्या एकूण निर्यातीत सुमारे ५० टक्के योगदान देतं, असंही ते म्हणाले. उत्पादन आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी नवउद्द्योजकांनी नव्या तंत्रज्ञानाचा अवलम्ब करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

शहीद जवान आणि अधिकाऱ्यांच्या वीरपत्नी, वीरमाता तसेच कायदेशीर वारसदारांना शासकीय शेतीजमिनीच्या हस्तांतरणावेळी मुद्रांक शुल्कातून पूर्ण सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने मंजूर केला असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूरात प्रसारमाध्यमांना दिली.

या निर्णयामुळे शहीदांच्या कुटुंबियांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, यापूर्वी त्यांनाही मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रवासी विमानाने प्रवास करण्याचा आदर्श घालून दिल्याचे सांगत, उद्धव ठाकरे यांनीही त्याच पद्धतीने प्रवास केल्याचे बावनकुळे यांनी स्वागत केले.विमान प्रवासादरम्यान प्रत्येकवेळी राजकीय चर्चा होत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मनपा अर्थसंकल्प

नागपूर महानगरपालिकेचा सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा ₹6,202.99 कोटींचा शिलकी अर्थसंकल्प स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी आज महापौर निता ठाकरे यांच्याकडे सादर केला. या अर्थसंकल्पात नागरिकांवर कोणताही नवीन कर न लावता विकासकामांवर भर देण्यात आला आहे. नाग नदी प्रदूषणमुक्तीसाठी कर्जरोख्यांद्वारे ₹200 कोटी उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे.प्रत्येक नगरसेवकाला प्रभाग विकासासाठी ₹25 लाखांचा निधी देण्यात येणार असून, 200 क्रीडांगणांच्या विकासाचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले आहे. याशिवाय Pay & Park योजना, महापौर माहेर योजना, स्मार्ट प्रभाग, बुनकर आणि मारबत महोत्सव, तसेच अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शताब्दी संग्रहालय उभारण्याची घोषणाही करण्यात आली. महापौर हर्ष-मुस्कान योजना, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, 12 नव्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी आणि 12 मनपा शाळांच्या पुनर्बांधणीवरही भर देण्यात आला आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी #VisitNagpur पुस्तिका, अनुभव केंद्र, अत्याधुनिक मत्स्यालय आणि स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर उभारण्याचाही प्रस्ताव अर्थसंकल्पात आहे.

जनसंपर्क कार्यक्रम

महालातील गडकरी वाडा येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात उद्या रविवार 28 जून रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत जनसंपर्क कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील, नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यार्थी वसतिगृह

अमरावती, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर आणि कोल्हापूर इथं सारथीची विभागीय केंद्रे, विद्यार्थी वसतिगृहे आणि प्रशिक्षण सुविधा उभारण्याचं काम सुरू असून पुढील वर्षभरात ही कामं पूर्ण होतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. सारथी अर्थात छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेतर्फे पुण्यात काल आयोजित विविध स्पर्धा परीक्षांत यश संपादन केलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

हवामान

येत्या काही तासात नागपूर जिल्ह्यासाठी मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यांचा जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे जारी करण्यात आला आहे याशिवाय वर्धा, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आगामी काही तासात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पर्जन्यवृष्टीचा यलो अलर्ट तर गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये तुरळकी ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

****